Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 17/06/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचाच्या, आपल्या वाटाच्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष



### कवी, नाटककार ज्योती प्रसाद अग्रवाल

ज्योती प्रसाद अग्रवाल हे आसाममधील एक प्रसिद्ध नाटककार, गीतकार, कवी, लेखक आणि चित्रपट निर्माते होते. त्यांना 'जॉयमोती' (१९३५) या चित्रपटासाठी आसामी चित्रपटाचे संस्थापक मानले जाते. अग्रवाल यांचा जन्म १७ जून १९०३ रोजी तामुलबारी येथे झाला. त्यांचे काका प्रसिद्ध कवी चंद्रकुमार अग्रवाल आणि आनंद चंद्र अग्रवाल हे होते. आसाम आणि कोलकात्यातील विविध शाळांमधून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी १९२१ मध्ये मॅट्रिकची पदवी प्राप्त केली. १९२६ मध्ये ते अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी एडिनबर्गला गेले, परंतु १९३० मध्ये त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होण्यापूर्वीच ते परतले. परत येताना त्यांनी जर्मनीतील यूएफए स्टुडिओमध्ये चित्रपट निर्मिती शिकण्यासाठी सात महिने घालवले.

जॉयमोतीच्या संपादनाला अंतिम स्पर्श देताना अग्रवाल आसामला परतल्यानंतर, त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठीचे त्यांचे उपक्रम सुरू ठेवले ज्यामुळे त्यांचे शिक्षण खंडित झाले होते. १९३२ मध्ये त्यांना पंधरा महिने तुरुंगवास भोगावा लागला. त्यांनी भोलागुरी टी इस्टेटमध्ये चित्रबन स्टुडिओची स्थापना केली. १९३३ च्या अखेरीस 'जॉयमोती' या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू केले. हा आसाममधील पहिला चित्रपट होता. १९३५ मध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट लक्ष्मीनाथ बेझबरुआ यांनी लिहिलेल्या नाटकावर आधारित होता. ज्यामध्ये अहोम राजकुमारी सती जॉयमोती हिला एका दमनकारी अहोम स्वर्गदिवाने तुरुंगात टाकले आणि छळले. १९३६ मध्ये त्यांनी देवजानी भुयानशी लग्न केले. १९४१ मध्ये त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ मध्ये ते ब्रिटिश दडपशाहीपासून वाचण्यासाठी भूमिगत झाले. आयुष्याच्या अखेरीस ते रोमँटिक विचारसरणीपासून अधिक मूलगामी दृष्टिकोनाकडे वळले. १७ जानेवारी १९५१ रोजी आसाममधील तेजपूर येथील पोकी येथील त्यांच्या निवासस्थानी कर्करोगाने त्यांचे निधन झाले.

Nashik Edition
Jun 17, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव** : कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
> - **रूपेश दराडे,** संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3